MIDC Police Station Jalgaon,
Dist. Jalgaon, Maharashtra
एमआयडीसी पोलीस स्टेशन, जिल्हा जळगाव
Ph. No.0257- 2210500. Email ID-pstn.midc@gmail.com.

**प्रेसनोट**

विषय :- **गोळीबार करणारे आरोपी अवघ्या 12 तासांचे आत अटक .**

राम विश्वास बोरसे रा रामेश्वर कॉलनी जळगाव आणी दिनेश भरत चौधरी हे लहाणपासुन मित्र आहेत. राम विश्वास बोरसे आणी दिनेश भारत चौधरी याची सख्खी बहीण डींपल चौधरी यांच्यात सन 2019 पासुन ओळखीचे रुपांतर प्रेमात झाले. परंतु सदर प्रकाराबाबत दिनेश चौधरी यास काहीएक माहीती नव्हते. साधारण 02 वर्षानंतर राम बोरसे आणी डींपल चौधरी यांच्यात प्रेमसंबध असल्याबाबत दिनेश चौधरी व त्याच्या घरच्यांनी माहीती झाली. म्हणुन डींपलच्या घरच्यांनी तिचे लग्न लावुन दिले. तेव्हापासुन दिनेश चौधरी आणी राम बोरसे यांच्यात वाद सुरु होता. परंतु डींपल हीचे मन तिच्या सासरी लागत नसल्याने व फारसे पटत नसल्याने डींपल हीने तिच्या नव-याविरुध्द कोर्टात घटस्फोटा ची केस दाखल केली होती. याकारणावरुन दिनेश चौधरी आणी राम बोरसे यांच्यात माझी बहीणीचा संसार तुझ्या मुळे तुटत आहे. मी तुला जिवंत सोडणार नाही अशी धमकि देवुन राम बोरसे हा जिथे दिसेल तिथे दिनेश चौधरी शिवीगाळ करुन तुला पाहुण घेईल अशी धमकि देत होता. दिनेश चौधरी याच्या मनात आपली बहीण डींपल हीचा संसार राम बोरसे याच्या मुळेच तुटत आहे असा समज झाल्याने दिनांक 01/04/2025 रोजी दिनेश चौधरी आणी त्याच्या नातेवाईकांनी मिळुन राम बोरसे याला मारहाण केली होती. राम बोरसे याने एमआयडीसी पोलीस स्टेशनला तक्रार दिल्यावरुन पनाका दाखल करण्यात आली.

दिनांक 24/04/2025 रोजी राम बोरसे हा रात्री 12.30 वाजेच्या सुमारास शाम बोरसे याला साईसीटी कुसूंबा येथे सोडण्यासाठी मोटार सायकलने सोडण्यासाठी गेला होता. त्याला सोडुन घरी अशोक किराणा चौकाकडुन मोटार सायकलने घरी येत असतांना चौकात दिनेश चौधरी, विजय चौधरी, आणी ललीत पाटील व अजुन दोन ईसम बसलेले दिसले. राम बोरसे हा घरी गेला व जेवन करीत असतांना बाहेरुन कोणीतरी घराच्या दरवाजावर फायरींग करण्याच्या आवाज आल्याने राम बोरसे हा घराबाहेर आला असता त्याला घराचे बाहेर दिनेश चौधरी व अन्य दोन जण मोटार सायकलने पळुन जातांना दिसले. लागलीच राम बोरसे याने एमआयडीसी पोलीस स्टेशनला घरावर फायरींग केल्याबाबत माहीती दिल्यावरुन नाईट गस्त अधिकारी व अंमलदार यांनी घटनास्थळी भेट दिली असता दरवाजावर गोळीबार झाल्याचे दिसुन आले. राम बोरसे याने दिलेल्या फिर्यादीवरुन गुन्हा रजि नंबर 297/2025 आर्म ॲक्ट 3/25, भारतीय न्याय संहीता कलम 333, 125, 3(5) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर घटना ही दिनेश भरत चौधरी याचे मित्र सागर फुलचंद जाधव, आकाश सुनील नागपुरे यांनी दिनेश चौधरी च्या बहीणीच्या प्रेमसंबधातुन राम बोरसे याच्या घरावर गोळीबार केल्याचे तपासात निष्पन्न झाल्याने त्यांचा माग काढत असतांना पोलीस निरीक्षक संदीप पाटील यांना गोपणीय बातमी मिळाली की, तीनही ईसम हे पाळधी येथे आहे अशा बातमीवरुन सदरचे पथक हे दोन टिम तयार करुन पाळधी येथे रवाना झाले. सदर आरोपीतांचा शोध घेत असतांना वरील तीनही ईसम हे एका हॉटेलच्या मागे दिसुन आले. सदरचे पथक हे त्यांच्या जवळ जात असतांना तीनही ईसम हे पळुन जाण्याच्या त्यारीत असतांना शिताफिने त्यांचा पाठलाग करुन त्यांना पकडण्यात आले. दिनेश भरत चौधरी याचे मित्र सागर फुलचंद जाधव, आकाश सुनील नागपुरे यांना ताब्यात घेवुन त्यांना अटक करुन मा. न्यायालयाकडुन 03 दिवस पोलीस कस्टडी रीमांड घेवुन रीमांड दरम्यान दिनेश भरत चौधरी याने गुन्ह्यात

वापरलेला 30,000/- रुपये किंमतीचा गावठी बनावटीचा कट्टा, गुन्ह्यात वापरलेली 80,000/- रुपये किंमतीची बजाज पल्सर मोटार सायकल असा एकुण 1,10,000/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदरची कारवाई ही मा. पोलीस अधीक्षक महेश्वर रेड्डी, मा. अपर पोलीस अधिक्षक श्री अशोक नखाते, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी जळगाव भाग संदीप गावीत, पोलीस निरीक्षक संदीप पाटील यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शोधपथकातील पोउपनि चंद्रकांत धनके, अशोक काळे, पोहेका गणेश शिरसाळे, पोना किशोर पाटील, योगेश बारी, नितीन ठाकुर, नाना तायडे, किरण पाटील, राहुल घेटे, अशांनी केली आहे.

**गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि अशोक काळे व पोका नरेंद्र मोरे हे करीत आहे.**

जनसंपर्क अधिकारी
जळगांव


MIDC पोलीस स्टेशन